CMYK

अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शनिवार, दि. १३ जुलै २०२४ । वर्ष : २२ वे अंक : २८४ वा किंमत : ५ रुपये पाने ८

## अडीच लाख किंमतीचे दागिने असलेली पर्स लंपास

**सोलापूर** : दागिने असलेली पर्स चोरून नेल्याची घटना बुधवार बाजार येथे घडली.याप्रकरणी दीपाली नागेश व्हनशेट्टी (वय-४६,रा. शिवसागर नगर, गुरुपर्वती निवास शेळगी) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी यांचे सोन्याचे गंठण हे बुधवार बाजार येथील अमीर ज्वेलर्स येथून नवीन बनवलेले मनी मंगळसूत्र घेऊन ते गुलाबी रंगाच्या पर्समध्ये ठेवले व ती पर्सन भाजीपाल्याचे पिशवीत ठेवली होती. तेथून घरी जाण्यासाठी रिक्षा जवळ फिर्यादी या गेल्या असता,तेथे भाजीपालाच्या पिशवीत ठेवलेली गुलाबी पर्स दिसून आली नाही.त्यावेळी फिर्यादी यांची खात्री पटली की, पर्समध्ये ठेवलेले २ लाख ३९ हजार ३७५ रुपये किमतीचे दागिने असलेली पर्स अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.

## मूल–बाळसाठी विवाहितेला मारहाण; पतीसह आठ जणांवर गुन्हा

**सोलापूर** : विवाहिता ही सासरी नांदत असताना सासरकडच्या मंडळींनी मिळून विवाहितेला तुला मुलं बाळ होत नाही, असे म्हणत शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच आई-वडिलांकडून सतत पैशाची मागणी करत पैसे दिले नाहीत म्हणून फिर्यादीस बेदम मारहाण केल्याची फिर्याद साक्षी ज्ञानेश्वर लिंबोळे (वय-२०, रा.रवींद्र नगर, ताई चौक) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे. फिर्यादीवरून पती ज्ञानेश्वर लिंबोळे,सासू संगीता लिंबोळे, सासरा अशोक लिंबोळे,दिर विनायक लिंबोळे, ननंद अंबिका पवार, आजी सासू,सासूचे भाऊ महादेव व तसेच कोंडी येथे राहणारे सासरे मामा यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस हवालदार कटके हे करीत आहेत.

# मागील भांडणाच्या रोषातून चिडून कोयत्याने सपासप वार महुदला सुनील कांबळे तरुणाचा काढला कायमचा काटा

## ● संशयित आरोपींना समोर आणण्यासाठी संतप्त नातेवाईकांचा रास्ता रोको

- दीड तास तणावाची परिस्थिती
- तिघा संशयितांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल

सांगोला/प्रतिनिधी

**पाठीमागे झालेल्या किरकोळ भांडणाच्या रोषातून चिडून तिघांनी मिळून कोयत्यासारख्या मोठ्या धारदार हत्याराने डोक्यात, मानेवर, छातीवर, हातावर, पोटावर गंभीर सपासप वार करून ३२ वर्षीय तरुणाचा निर्घृण खून करुन कायमचा काटा काढला. ही घटना गुरुवार (ता. ११) रोजी रात्रौ १० च्या सुमारास महूद (ता. सांगोला) येथील साठेनगर समाज मंदिराजवळ घडली. सुनील अनिल कांबळे (वय ३२ रा. महूद रा.सागोला) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे.**





दरम्यान, या घटनेच्या पार्श्वभूमीवर, निशा प्रभाकर कांबळे रा.साठेनगर, महुद ता. सांगोला, सध्या कॉटेज हॉस्पिटल जवळ पंढरपूर) यांनी फिर्याद दिली असून, पोलिसांनी ऋषीकेश ऊर्फ गोट्या भीमराव शिरतोडे (दोघेही रा.रामोशी गल्ली महूद) सोनु ऊर्फ अनिल यशवंत चव्हाण (रा. महूद बु।। ता. सांगोला) आणि अन्य एक अशा तिघांविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल केला. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड, पोलीस निरीक्षक भीमराव खणदाळे यांनी पोलीस फौज फाट्यासह धाव घेऊन घटनेची माहिती घेतली. मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवार (ता.११) रात्री १० च्या सुमारास ऋषीकेश ऊर्फ गोट्या भीमराव शिरतोडे आणि सोनु ऊर्फ अनिल यशवंत चव्हाण (दोघे रा. महुद ब्रु।।) यांनी साठेनगर समाजमंदिराजवळ येवून गणेश लोखंडे आणि सुनील कांबळे या दोघांना बुधवारी (ता.१०) झालेल्या किरकोळ भांडणाचा राग मनात धरुन तुम्हाला बघून घेतो, सोडत नसतो अशी धमकी दिली होती. तद्नंतर त्याच दिवशी गुरुवारी रात्री १०:१५ च्या सुमारास ऋषीकेश ऊर्फ गोट्या भीमराव शिरतोडे व घटनेतील अन्य एक संशयित हे साठेनगर महुद येथील समाज मंदिराजवळ हातात कोयत्यासारखी मोठी धारदार हत्यारे घेवून आले. यावेळी त्यांनी किरकोळ भांडणाच्या कारणावरुन चिडून सुनील अनिल कांबळे याचे डोक्यात, मानेवर, हातावर, छतीवर, पोटावर वार करुन गंभीर जखमी करुन त्याचा खून केला असे फिर्यादीत म्हटले आहे. संशयित आरोपी ऋषिकेश ऊर्फ गोट्या भीमराव शिरतोडे याला कोर्टात हजर केले असता १९ जुलैपर्यंत त्याला पोलीस कोठडी मिळाली तर दुसरा संशयित आरोपी हा अल्पवयीन असल्याने त्यास सोलापूर येथे बाल सुधार गृह येथे पाठवण्यात आले तर तिसरा संशयित आरोपी सोनू ऊर्फ अनिल यशवंत चव्हाण यास आज शनिवारी कोर्टासमोर हजर करण्यात येणार आहे.

### ● महुद-दिंघची रस्त्यावर रास्ता रोको नातेवाईकांचा आक्रोश

दरम्यान सुनील कांबळे खून प्रकरणातील आरोपींना घटनास्थळी आणावे, गुन्ह्यातील मास्टरमाइंडला शोधून काढावे या मागणीसाठी मृताची पत्नी मुले, नातेवाईकासह ग्रामस्थांनी आक्रोश करत महूद- दिघंची रोड रस्त्यानजीकच्या साठे नगर जवळ दीड तास रस्ता रोको केल्याने काही काळ गोंधळ उडाला होता.

**● पोलीस बंदोबस्तात अंत्यसंस्कार :** पोलिसांनी सुनील कांबळे खून प्रकरणात कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही, दोषींवर कायदेशीर कारवाई केली जाईल असे आश्वासन दिल्याने रस्ता रोको मागे घेण्यात आला त्यानंतर मृत सुनील कांबळे यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी पोलीस बंदोबस्त चोख ठेवला होता.

# ड्रेनेजच्या चेंबरमध्ये पडून महिलेचा मृत्यू

## ● जुना पुना नाका स्मशानभूमी जवळील दुर्घटना

- महापालिकेच्या गलथान कारभारविरुद्ध नागरिकांना संताप अनावर

सुराज्य/सोलापूर





येथील जुना पुना नाका स्मशानभूमी जवळील ड्रेनेज मध्ये बेशुद्ध अवस्थेत मिळून आलेल्या महिलेचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. महापालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ही दुर्घटना घडली असल्याचा आरोप करत नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. मंगल ऊर्फ पिंकी पिंटू कांबळे (वय ३४) असे या महिलेचे नाव असून आज शुक्रवारी दुपारी ही घटना उघडकिस आली.

यातील मृत मंगल पिंटू कांबळे या आज शुक्रवारी (ता. १२) दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास जुना पुना नाका स्मशानभूमी लगत ड्रेनेजमध्ये बेशुद्ध अवस्थेत मिळून आल्याने त्यांना फौजदार चावडी पोलीस ठाण्यातील पोलीस नाईक बी.जे. कसबे यांनी छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय (सिव्हील हॉस्पिटल) येथे दुपारी तीनच्या सुमारास उपचारासाठी दाखल केले असता ती उपचारापूर्वीच मयत झाली असल्याची नोंद सिव्हिल पोलिस चौकित झाली आहे. ही महिला जुना पुना नाका येथील स्मशानभूमी शेजारी एका झोपडीत राहत होती. त्यांच्या पश्चात पती आणि दोन लहान मुले असा परिवार आहे.

### ● झोन अधिकाऱ्याकडून माहिती मागवली

शहरातील जुना पुना नाका स्मशानभूमी जवळ ड्रेनेज चेंबर मध्ये बेशुद्ध अवस्थेत मिळून आलेल्या एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडल्याबाबत समजले. महापालिकेच्या संबंधित झोन अधिकाऱ्याकडून या संदर्भात माहिती मागवली आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती महानगरपालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी दिली.

### ● या प्रकरणाची चौकशी करा : पवार

चेंबर उघडे असल्याने मंगल कांबळे यांचा मृत्यू झाला असून महापालिका प्रशासनाला वारंवार सांगून सुद्धा काम झाले नाही असा आरोप करत या प्रकरणाची सखोल चौकशी करून कारवाई करावी तसेच मृताच्या नातेवाईकाला दहा लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात यावी. संबंधित अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी या भागातील सामाजिक कार्यकर्ते किरण पवार यांनी केली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



झालं बाई, एकदाच लग्न!

कल्याण
578-04-400

# देवेंद्र फडणवीस यांच्या 'मॅजिक पॅटर्न'ची हॅट्ट्रीक



मुंबई : आनंदोत्सव साजरा करताना महायुतीचे नेते.

**मुंबई** : विधान परिषद निवडणुकीच्या गणितात भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची जादू कायम असल्याचे पाहायला मिळाले. फडणवीसांचा मॅजिक पॅटर्न सलग तिसऱ्यांदा कायम असल्याचा दिसला. कारण महायुतीचे सर्व ९ उमेदवार विधानपरिषद निवडणुकीत विजयी झाले आहेत.

महायुतीचे उमेदवार योगेश टिळेकर, पंकजा मुंडे, सदाभाऊ खोत, परिणय फुके, अमित गोरखे यांचा विजय झाला. अजितदादांचे उमेदवार शिवाजीराव गर्जे आणि राजेश विटेकर विजयी झाले. तिकडे शिंदे गटाच्या शिवसेनेच्या भावना गवळी आणि कृपाल तुमानेंनाही गुलाल लागला. यापूर्वी फडणवीसांना महाविकास आघाडीला दोनवेळा धक्का दिला होता. १० जून २०२२ रोजी राज्यसभा तर २० जून २०२२ रोजी विधानपरिषदेच्या निवडणुकीत फडणवीसांनी आपल्या मॅजिक पॅटर्नन महाविकास आघाडीला मोठा धक्का दिला होता. २०२२ च्या निवडणुकीचे मुख्य सूत्रधार फडणवीस यांच्यामुळेच महाविकास आघाडी सरकार कोसळले होते.

### 'हे' आहेत विजयी शिलेदार

**भाजप**
- योगेश टिळेकर - २६ मते
- पंकजा मुंडे - २६ मते
- परिणय फुके- २६ मते
- अमित गोरखे - २६ मते
- सदाभाऊ खोत - २४

**एकनाथ शिंदे शिवसेना**
- भावना गवळी -२४
- कृपाल तुमाने- २५

**राष्ट्रवादी (अजित पवार)**
- शिवाजीराव गर्जे - २३
- राजेश विटेकर -२३

**काँग्रेस विजयी उमेदवार**
- प्रज्ञा सातव - २६

**शिवसेना ठाकरे**
- मिलींद नार्वेकर - २४

**जयंत पाटील पराभूत :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या पाठिंब्यावर उभे राहिलेले शेकापचे जयंत पाटील यांचा या निवडणुकीत पराभव झाला. शरद पवार गटाचे १२ आमदार आहेत. या सर्व १२ आमदारांची मते जयंत पाटील यांना पडली.

### विधानपरिषद निकालाची वैशिष्ट्ये...



- काँग्रेसची एकूण ८ मते फुटली
- दोन वर्षानंतर पुन्हा एकदा फडणवीस यांचा राजकीय वरचष्मा
- शरद पवारांना अजित पवारांचे एकही मत फोडता आले नाही
- उद्धव ठाकरेंना शिंदे यांचे एकही मत फोडता आले नाही
- भाजपचे तरूण चेहरे विधानपरिषदेत दिसणार
- पंकजा मुंडे यांचं राजकीय पुनर्वसन
- अमित गोरखेंच्या रूपानं मातंग समाजातील तरूण चेहरा विधानपरिषदेत
- योगेश टिळेकर यांच्या माध्यमातून माळी समाजाला नेतृत्व
- खोत यांच्या रूपात शेतकरी आणि चळवळीत कार्यकर्ता पुन्हा आमदार

### धक्कादायक निकालांचा मॅजिक पॅटर्न

फडणवीसांनी २०२२ च्या धक्कादायक निकालांचा मॅजिक पॅटर्न पुन्हा एकदा खरा करून दाखवला. २०२२ ला राज्यसभा आणि विधानपरिषदेत विजयानंतर फडणवीसांनी विजयी हॅट्रिक केली. महत्वाचे म्हणजे सलग ५ टर्म आमदार असणारे शेकापचे जयंत पाटील जे शरद पवार पुरस्कृत उमेदवार होते, त्यांनाही महायुती आणि फडणवीसांनी धोबीपछाड दिली.

### अजित पवार गटाचे दोन्ही उमेदवार विजयी

अटीतटीच्या ठरलेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीत अजित पवार गटाच्या दोन्ही उमेदवारांचा विजय झाला आहे. अजित पवार गटाचे राजेश विटेकर हे २३ तर शिवाजीराव गर्जे हे २४ मते घेऊन विजयी झाले आहेत. लोकसभेतील पराभवानंतर अजित पवार गटाचा हा पहिलाच मोठा विजय आहे. दरम्यान, अजित पवार गटाकडे ४२ आमदार असतानाही त्यांना ४७ मते मिळाली आहेत. त्यामुळे ही उर्वरित पाच मते कोणाची मिळाली असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# कमाईसाठी रेल्वे गाड्यांमध्ये तृतीयपंथीयांचा धुमाकूळ सुरुच

## ● पैसे उकळण्यासाठी चक्क कपडे उतरविण्याचा कसला पॅटर्न?
## ● चोरट्यांकडून लूट अन् तृतीयपंथीयांची आर्थिक लूट रेल्वे प्रवासी अडकले चक्रव्युहात

- रेल्वे डब्यातील तृतीयपंथ्यांबद्दलच्या वावरावर प्रवाशांचा संताप
- किन्नरांकडून प्रवाशांचा छळवाद होण्याचे वाढले प्रकार
- शरमेनं मान खाली घालण्याची शिक्षा प्रवाशांना का?
- बंदोबस्तासाठीचे कार्यरत पोलीस नेमका कोणाचा करतात बंदोबस्त?
- प्रवाशांना अपमानित करण्यासह मनाला लज्जा वाटेल अशी वागणूक देण्याचा अधिकार तृतीयपंथियांना दिला कोणी?

दीपक शिराळकर/सोलापूर

समाजात तृतीयपंथीयांकडे पाहण्याचा दृष्टीकोन वेगळा आहे, तर त्यांच्याविषयी अनेकांना सहानुभूतीही असते. पण रेल्वेत पैसे मागण्यासाठी येणाऱ्या तृतीयपंथीयांची अक्षरश: मुजोरी सुरु आहे. पैसे उकळण्यसाठी त्यांच्याकडून बळजबरी करण्याचा बिनधास्त प्रकार सुरु आहे. पैशासाठी प्रवाशांना मारझोड करणं, कुंटुबिय समवेत असताना अश्लील हावभाव करणं, अत्यंत खालच्या भाषेत शिवीगाळ करणं, प्रसंगी अंगावरील कपडे उतरविण्याचं नाटक करणं असे अभद्र प्रकार घडताहेत. प्रवास भाड्याचे पैसे मोजून आपला प्रवास सुखदायी अन् आरामदायी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या रेल्वे प्रवाशांचा तृतीयपंथीयांकडून अक्षरश: छळवाद सुरु आहे. तृतीयपंथीयांचही थेरं बघून शरमेने मान खाली घालण्याची शिक्षा रेल्वे डब्यातील पुरुष आणि स्त्रीयांना भोगावी लागत आहे.





सोलापूर मध्य रेल्वे विभागात बहुतांश सर्वच रेल्वे गाड्यांमध्ये तृतीयपंथीयांचा उच्छाद वाढला आहे. त्यांच्याकडून आर्थिक लुटीसह मानसिक त्रास देण्याचे प्रकार सुरु आहेत. त्यातून रेल्वे प्रवाशांची बेजारी होत आहे. त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. अश्लिल हावभाव करणे, शिवीगाळ करणे असे प्रकार मोठ्या प्रमाणात होत आहेत. तृतीयपंथींना रेल्वे गाड्यांमध्ये प्रवेश देण्यावर निर्बंध आणायला हवेत. पोलीस प्रशासने त्यांचा कायमचा बंदोबस्त करावा.

**- राजाभाऊ जाधव,**
अध्यक्ष, रेल्वे प्रवासी संघटना, सोलापूर

### ● तृतीयपंथीयांना कोणाचा आशीर्वाद ?

साधारण जनरल व स्लीपर कोचमध्ये ही वसुली केली जाते. पैसे न दिल्यास शिव्या, शाप दिले जातात. रेल्वे गाडीत आरपीएफ आणि लोहमार्ग पोलिस असूनही तृतीयपंथीयांचा बंदोबस्त का होत नाही. सुरक्षा यंत्रणांचे अधिकारी व कर्मचारी कार्यरत असतात मात्र हप्तेखोरीमुळे या यंत्रणांचा आत्माच मेल्याचा उघड आरोप प्रवासी आता करू लागले आहेत.

### ● पैसे उकळ्यासाठी प्रसंगी थेट कपडे उतरविण्याचे नाटक

साधारण माणसे आपल्या कुटुंबासोबत प्रवास करत असतात. बाजूचा पैसे दिला तू पण दे अशी जबरदस्ती करतात. कोणाकडे चिल्लर असती तर कधी नसतेसुद्धा. तृतीयपंथी हे प्रवाशी कुटुंबासमोर स्वत:च्या अंगावरील कपडे उतरविण्याचे नाटक करीत भीती दाखवतात. त्यावेळेस कुटुंबासमोर शरमेने मान खाली करावी लागते, ही वस्तुस्थिती आहे.

### ● रेल्वेच्या वेळापत्रकानुसार ठरते 'यांचे' नियोजन

एक तृतीयपंथी किमान दोन तीन हजार रुपये कमवतो ,अशी चर्चा आहे. सोलापूर येथून गाडी निघल्यानंतर गाड्यांची गती सिग्नल लागण्याच्या ठिकाणी कमी होते. त्या दरम्यान तृतीयपंथी गाड्यात घुसतात. कुर्डूवाडी, दौंड या ठिकाणी ते उतरतात. तेथून दुसरी टोळी रेल्वे डब्यात घुसते अन् पुढे पैसे मागण्याचा सिलसिला कायम राहतो.

CMYK